नि. फौ. ख. क्र.३१०/२०२६
निशाणी क्र.

**<u>आरोपी न्यायाधीन बंदी असल्यामुळे त्यांना व्ही.सी. द्वारे हजर करण्यात आले.</u>**

**<u>साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**
**साक्षीदाराचे नाव– सागर विठ्ठल लवटे**
वय–३९  वर्षे, धंदा–पोलीस हेड कॉन्टेबल
नेमणूक – स्थानिक गुन्हेअन्वेषण शाखा सांगली

**<u>सरकारतर्फे  विधिज्ञ श्री.एस. बी. हत्तरगी यांचेमार्फत साक्षीदाराचा सरतपास शपथेवर सुरु...</u>**

दि.१७/०३/२०२६ रोजी हेड कॉन्स्टेबल म्हणून माझी नेमणूक स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा येथे होती. त्यादिवशी आम्ही सांगली शहर विभागामध्ये पेट्रोलिंगला असताना मला, पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिल कोळेकर व कॉन्स्टेबल विक्रम खोत यांना दोन इसम सोने चांदीचे दागिने विक्री करण्यासाठी झुलेलाल मंदिर येथे हॉटेल वुडलँड येथे येणार असल्याची बातमी मिळाली. सदरची बातमी मी वरिष्ठांना कळवून पेट्रोलींगसाठी आमच्या बरोबर असणारे पी एस आय महादेव पवार व इतर स्टाफ असे एस टी स्टँड रोडने वुडलँड हॉटेल जवळ गेलो. बातमीप्रमाणे गाडी लावून आम्ही पुढे चालत गेलो व तिथे दोन इसम झुलेलाल मंदीरच्या बाजूला गाडी लावून उभे असलेले दिसले. त्यावेळी आम्ही देवेंद्र कांबळे व रफिक शेख असे दोन पंचांना बोलावून घेतले. त्यानंतर आम्हाला दोन इसमांचा संशय आल्याने त्यांच्या जवळ गेलो. त्यांची पी एस आय महादेव पवार यांनी चौकशी केली असता त्यांना मराठी व हिंदी स्पष्ट बोलता येत नव्हते. त्यांच्या ताब्यातील काळया रंगाची डिस्कव्हर गाडीबद्दल विचारले असता त्यांना सांगता आले नाही. त्यामुळे त्यांच्यावर संशय बाळगुन त्यांना १६.४५ वाजता ताब्यात घेवून त्यांचे नाव गाव विचारले असता त्यातील एका इसमाने स्वतःने नाव हिमेल सोनार वय ३५ असे सांगितले व दुस–याने पोरेश चोकदार वय २७ वर्षे असे सांगितले. त्यावेळी हिमेल सोनार ने स्वतःचा पत्ता जिल्हा दिनाशपुर विभाग रणपूर, राज्य उत्तरभंगो देश बांगलादेश असे सांगितले व पोरेश चोकदार ने सुध्दा

तोच पत्ता सांगितला. त्यांनंतर हिमेल सोनार याची अंगझडती घेतली त्याच्या उजव्या खिशामध्ये एक ओ.पो कंपनीचा मोबाईल, रोख रक्कम ६ हजार व बांगलादेशी नागरिक असलेले कार्ड त्याचा नंबर ७७६६४७३७७६ असा होता. व डाव्या खिशामध्ये सोन्याचे दागिने मिळून आले. तसेच पोरेश चोकदार याच्याकडे अमेरिकन टुरिस्ट कंपनीची एक बॅग होती त्यामध्ये चांदीचे दागिने मिळून आले. यावर त्यांना पंचांसमक्ष चौकशी केली असता त्यांनी सदरचे दागिने हे मागील आठवड्यात सांगली सिव्हील हॉस्पीटल परिसरात चोरी केल्याचे सांगितले. सदर मुद्देमालाबाबात पडताळणी करण्यासाठी पोलीस हेड कॉन्स्टेबल दरीबा बंडगर यांना सांगितले. त्यातील काही मुद्देमाल सांगली शहर पोलीस ठाणे गु.र.नं. १०९/२०२६ मधील असल्याचे समजले. सदर आरोपींकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी अशाच प्रकारचे गुन्हे संजयनगर, तासगाव व पलूस भागामध्ये केल्याचे सांगितले. सदरचा मुद्देमाल हा सांगली शहर पोलीस ठाण्यात पंचनाम्याने जमा केला. मी आरोपी बांगलादेशी नागरिक असून बेकायदेशीरपणे भारतात वास्तव्य केल्याबद्दल त्यांच्या विरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला सदरची फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी पी१ / पी डब्लु १** देण्यात येते. आता मला छापील फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी पी२/पी डब्लु १** देण्यात येते. मी दिनांक २१/०३/२०२६ रोजी पोलीसांना पुरवणी जबाब दिला. आता मला सदरचा पुरवणी जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी३/पी डब्लु १** देण्यात येते. मी मुद्देमाल दाखवल्यास ओळखू शकेन. आरोपीच्या मोबाईलमध्ये आय एम ओ ॲप मिळून आले. त्याच्या द्वारे तो बांगलादेशी नातेवाईकांशी संपर्क करत असलेचे समजले तसेच त्याच्या मोबाईलमध्ये ८८० नंबर चा कोड असलेले नंबर आढळून आले. सदरचा ८८० कोड हा बांगलादेशचा आहे. त्यावरुन ते बांगलादेशी नागरीक असलेचे निष्पन्न झाले.

**मध्यांतरामुळे सरतपास तहकुब..**

आता मला आरोपींकडून जप्त केलेला मुद्देमाल मोबाईल व ओळखपत्र दाखवण्यात आले. आरोपींकडून जप्त केलेला हाच मुद्देमाल आहे. मुदे्दमालापैकी मोबाईलला

**MO–1** व ओळखपत्रास **MO–2** देण्यात येते. आरोपींना मी ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात व्ही. सी द्वारे हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ एम एम बुरुंगले यांचे मार्फत सुरु...</u>**

२. मी स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखेत गेल्या एक वर्षापासून नेमणूकीस आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक पोलीस ठाण्यात तसेच आमच्या कार्यालयातही ड्युटी बटवडा रजिष्टर असते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये पेट्रोलिंगची ड्युटी नमुद असते. हे म्हणणे खरे नाही की, ड्युटी बटवडा रजिष्टरमध्ये प्रत्येकाच्या ड्युटीच्या वेळा नमुद असतात. साक्षीदार सांगतो की, आमच्या कार्यालयामध्ये तशा वेळांच्या नोंदी केल्या जात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, स्थानिक गुन्हे शाखेमध्ये कोणाच्याच ड्युटीच्या वेळा नमुद केलेल्या नसतात. साक्षीदार सांगतो की, कर्तव्यावर हजर झालेची नोंद असते. आम्ही सदर दिवशी पेट्रोलिंगला सरकारी वाहनाने गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, सरकारी वाहन घेवून जातानाची व त्याच्या कारणाची नोंद लॉकबुक ला असते. मला त्या दिवशी नेलेल्या वाहनाचा क्रमांक आठवत नाही. ती कोणती गाडी होती हे देखील मला आठवत नाही. आम्ही सात ते आठ पोलीस कर्मचारी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळी पोहोचल्यावर पंचांना बोलावले.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींना हिंदी व मराठी निटसे समजत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांची भाषा समजणारा इसम त्यावेळेस आमच्यासोबत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत इसमांना आम्ही त्यांना समजणा–या भाषेत आमची अंगझडती घेण्याबद्दलची माहिती दिलेली नाही त्यामुळे त्यांनी आमची अंगझडती घेतली नाही असा प्रकार घडला होता. हे म्हणणे खरे आहे की, वुडलॅंड ते झुलेलाल मंदिरा जवळ कोणतेही सोन्याचे दुकान नाही. आम्हाला त्या दोन इसमांशिवाय संशय येईल असा कोणता इसम आढळून आला नाही. पंचांनी आमची अंगझडती घेतली असे काही घडले नाही.

४. हे मला माहिती नाही की, भारतामध्ये आय. एम. ओ. हे ॲप

वापरण्यास बंदी नाही. हे म्हणणे खरे आहे की, आय एम ओ ॲप हे चॅटिंग व कॉलिंग करीता वापरतात. हे म्हणणे खरे आहे की, भारताबाहेरील व्यक्तीचा नंबर मोबाईलमध्ये सेव्ह करायचा झाल्यास त्या त्या देशातील कोड वापरुन सेव्ह करतात. हे म्हणणे खरे आहे की, घटना १७ तारखेची असून वर्दीजबाब २० तारखेला दिला गेला या तीन दिवसांच्या उशीराचा खुलासा वर्दीजबाबात नाही.

**प्रश्न –** आपल्याला असा खुलासा वर्दीजबाबात देण्यास काही अडचण नव्हती?

**उत्तर –** मी माझ्या पुरवणी जबाबात खुलासा दिला आहे.

आता मला पी ३ वरील पुरवणी जबाब दाखवण्यात आला. साक्षीदार सांगतो त्यातील शेवटच्या परिच्छेदात मी खुलासा दिला आहे. आता मला MO–2 दाखवण्यात आला. प्रथमदर्शनी पाहून तो मुळ दस्ताऐवज आहे किंवा नाही हे मी सांगू शकत नाही. MO–2 च्या मागील भागात काय मजकूर हे स्पष्ट नसल्यामुळे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, MO–2 वरील इसमाचा चेहरा स्पष्ट दिसत नाही. तसेच MO–2 वर इंग्रजी भाषेत लाल अक्षरात Temporary National ID Card असे लिहिले आहे.

५. पेट्रोलिंगच्या संदर्भातील कागदपत्रे तपासी अंमलदारांनी माझ्याकडून घेतले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही वुडलॅंड ते झुलेलाल मंदीराकडे गेलो नव्हतो. तथाकथीत इसमांकडून कोणतीही जप्ती झालेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दि.१७/०३/२०२६ रोजी आम्ही कोणत्याही दोन इसमांना ताब्यात घेतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपींना अंगझडतीबाबत काही सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत इसमांच्या अंगझडतीतून मोबाईल व आय. डी. कार्ड जप्त झाले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या मोबाईलमध्ये आय एम ओ ॲप असलेचे, त्यावरुन तो बांगलादेशमधील नातेवाईकांशी संपर्क साधत असल्याचे, सदर मोबाईलमध्ये ८८० या इंटरनॅशनल कोड सह फोन नंबर सेव्ह केल्याचे मी खोटे सांगत आहे. आम्ही आरोपीने प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत, मुद्देमालाबाबत काही सांगितले नाही म्हणून ताब्यात घेतले. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत इसमांच्या ताब्यात १७ तारखेला सोन्याचे दागिने सापडले होते. हे म्हणणे खरे आहे की, वर्दीमध्ये मी सोन्याचांदीचे दागिने झडतीमध्ये मिळाल्याचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वर्दीजबाबात मला ही गोष्ट नमुद करण्यास अडचण

नव्हती.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातुन अशा कोणत्याही वस्तु सापडल्या नाहीत म्हणूनच त्यांचा उल्लेख वर्दीजबाबात नाही.  हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांशी विचारविनिमय करुन पश्चात बुध्दीने मी पुरवणी जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास  सुरु...**

६.  मी वर्दीजबाबात आरोपींकडून जप्त गोष्टींचा उल्लेख केला नाही कारण फिर्याद ही बेकायदा परदेशी नागरीकांच्या वास्तव्याची होती.

**उलटतपास...**

७.  हे म्हणणे खरे नाही की, मी सोयीस्करपणे केवळ अर्धवट घटना वर्दीजबाबात मांडली आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर जबानी स्वीकृत**

**समक्ष**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VEDVATI ANIRUDHA ADYA
Date: 2026.07.31 15:46:01 +0530

**(व्ही. ए. आदय)**

**दिनांक – ३१.०७.२०२६**  **६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,  सांगली.**